D:\VANASHREE\DO Letter to Commissioner Pune reg Identified Area doc

प्रकाश ठोसरे.
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे यांचे कार्यालय,
जुनी पी एम टी बिल्डींग, स्वारगेट, पुणे.

अर्ध शासकीय पत्र क्रमांक कक्ष-१/जमीन/फा.नं.७४/ ५७ /२००६-२००७.
पुणे-४११ ०३७, दिनांक ९ मे, २००६.

उपवनसंरक्षक पुणे वनविभाग, पुणे
आवक ३६
10 MAY 2006

(२९६)

विषय- याचिका क्रमांक २०२/९५ व १७१/९६ (गोदावरमन विरुध्द भारत सरकार) यामध्ये दिनांक १२.१२.१९९६ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे अनुषंगाने "वन" या संज्ञेत येणा-या क्षेत्रासंबंधी तज्ञ समितीची (Expert Committee) स्थापना.

संदर्भ- या कार्यालयाचे जिल्हाधिकारी, पुणे यांना उद्देशून लिहिलेले व प्रत आपणांस अग्रेषित केलेले अर्ध शासकीय पत्र क्रमांक कक्ष-१/ जमीन/ ५६८, दिनांक १० मार्च, २००५.

प्रिय श्री.

विषयांकित प्रकरणाचे अनुषंगाने, उपरोक्त संदर्भित पत्राचे अवलोकन होण्यास विनंती आहे. सुलभ संदर्भासाठी सदर पत्राची छायांकित प्रत सोबत जोडून पाठविली आहे.

२.०० टेमघर, वरसगांव व पानशेत धरणातील पाणलोट क्षेत्राचा मी नुकताच दौरा केला आहे. त्यावेळी असे आढळून आले आहे की, पाणलोट क्षेत्रातील खाजगी मालकी जमीनी ज्या वनसदृष्य जमीनी आहेत, या वृक्षांच्छादीत जमीनीमध्ये राब करुन, शेतीसाठी जमीनी तयार केलेल्या आहेत. त्याची काही छायाचित्रे मी सोबत अवलोकनार्थ जोडली आहेत. वनसदृष्य असणा-या या जमीनी, यापुर्वीच "वन" या संज्ञेत समाविष्ठ करुन त्याचे संरक्षण व संवर्धन करणे आवश्यक होते.

३.०० पुणे जिल्ह्यात असणारी टेमघर, वरसगांव व पानशेत ही धरणे पुणे शहरास पिण्याचे पाणी-पुरवठ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहेत. ह्या धरणांचे पाणलोटांचे संरक्षण न झाल्यास, जमीनीची धूप होऊन ह्या धरणांची क्षमता झपाट्याने कमी होऊन, धरणांचे आयुष्यदेखील कमी होईल. त्याच प्रमाणे सदर धरणाचे पाणलोट क्षेत्र हे दूर्मिळ वन्यजीवांचे आश्रयस्थान आहे. विशेषतः वाघ / बिबटे तसेच इतर वन्यजीव यांचे भ्रमंतीच्यादृष्टीने (Corridor) असल्याने या क्षेत्रास अनन्यसाधारण महत्व आहे. जैविकविविधतेच्यादृष्टीने जगातील जी १८ संवेदनक्षम ठिकाणे (Hot spot) निवडण्यांत आलेली आहेत त्यामध्ये भारतात असलेल्या दोन संवेदनक्षम ठिकाणांपैकी पश्चिम घाट हे एक आहे. पर्यावरण संतूलनाच्यादृष्टिनेही या क्षेत्रास अत्यंत महत्व आहे. अशा या क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन गांभिर्याने करणे आवश्यक आहे.

५.०० उपरोक्त वस्तुस्थितीचे अनुषंगाने आपणांस विनंती करण्यांत येते की, पुणे जिल्ह्यातील विशेषतः पश्चिम क्षेत्रात येणा-या भोर, वेल्हे, मुळशी, मावळ, खेड (राजगुरुनगर), आंबेगांव व जुन्नर या तालुक्यातील वनसदृष्य खाजगी जमीनींचे पुर्नविलोकन होणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने याबाबत महसूल व वन विभागाने वनसदृष्य खाजगी वनांची सुधारीत माहिती, तज्ञ समितीच्या (Expert Committee) मार्फत सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करण्याची कार्यवाही करण्याबाबत संबंधीतास कळविण्यांस विनंती आहे.

आपला

सही/-

( प्र. ज. ठोसरे )

श्री. पी. डी. करंदीकर,
विभागीय आयुक्त,
पुणे महसूल विभाग, पुणे.

प्रतिलिपि,

(१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे प्रकरणातील छायांचित्रांसह माहितीसाठी सादर.

(२) जिल्हाधिकारी, पुणे यांचकडे संदर्भित पत्राचे अनुषंगाने माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत,

उपवनसंरक्षक, पुणे / जुन्नर व उप विभागीय वन अधिकारी, भोर यांचे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्र. ज. ठोसरे

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.

सपरद्द आज्ञा पत्र मा उपवनसंरक्षक यांनी निर्देशित आवक

B
१०१५